# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ,कार्यस्वरूप आणि वास्तव

**संजना संजय भालकर** Ph .D संशोधक शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर Email ID-sanjanabhalkar12@gmail.com

**प्रा.डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई** प्रभारी प्राचार्या आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी .

ता. भुदरगड ,जि .कोल्हापूर ,महाराष्ट्र. संलग्नित शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर Email-drpratibhadesai@gmail.com

---

**सारांश:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अत्यंत बुद्धिमान असे प्रकांडपंडित संपादक व लेखक अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्याय विरुद्ध लढणारे व अस्पृश्यांना सर्व प्रकारची सामाजिक व राजकीय अधिकार प्राप्त करून देण्यासाठी संघर्ष करणारे झुंजार नेते ,समाज क्रांतिकारक, थोर कायदेपंडित व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ,एक उत्कृष्ट संसदपटू ,अत्यंत कार्यक्षम केंद्रीय विधिमंत्री आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचे अभिनव भाष्यकार विविध नात्यांनी सगळ्यांना परिचित आहेत सगळ्या अस्पृश्यांना संघटित करून अन्यायविरुद्ध लढण्यासाठी व समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'शेड्युल कास्ट फेडरेशन' ही संस्था प्रस्थापित करून त्याचे नेतृत्व केले.

**मुख्य संबोध:-** डॉ बाबासाहेब आंबेडकर, कार्यवाद व जॉन ड्युई

**प्रस्तावना :-** भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. भारताच्या नवनिर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. भारतीय संविधानाच्या निर्मिती मधून त्यांचे हे श्रेष्ठत्व प्रमाणित होते. भारतासारख्या खंडप्राय देशांमध्ये प्रादेशिक, भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे, मात्र भारतीय संविधानाच्या माध्यमातून भारताला एकसंघ ठेवण्याचे कार्य प्रामुख्याने होत आहेत "आम्ही सर्व भारतीय लोक "ही एकात्मतेची भावना संविधानाच्या प्रास्ताविकेत मांडलेली असून, भारताच्या प्रत्येक नागरिकास सामाजिक, आर्थिक, राजनैतिक,न्याय विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्याचे आश्वासन दिलेले आहे.म्हणून भारताचे संविधान हे नवभारताचे प्रेरणास्तव ठरते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१. डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक विचार, स्त्री विषयक दृष्टीकोन, स्त्री शिक्षण विषयक विचार व शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

२. डॉ.आंबेडकर व कार्यवादातील जॉन ड्युई त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे.

**प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व:-**

प्रस्तुत संशोधन हे डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक विचार, स्त्री विषयक दृष्टीकोन, स्त्री शिक्षण विषयक विचार व शैक्षणिक विचारांचे प्रभाव सध्याच्या काळात कसा पडला आहे हे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर व कार्यवादाचे प्रणेते जॉन् ड्युई यांच्या विचारांचा सद्यस्थितीतील शिक्षणावर कसा प्रभाव पडला आहे हे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

**संशोधनाची परिमर्यादा**:-

प्रस्तुत संशोधन हे डॉक्टर आंबेडकर यांच्या सामाजिक विचार स्त्री विषयक दृष्टीकोन, स्त्री शिक्षण विषयक विचार, व कार्यवादाचे प्रणेते जॉन ड्युई या पुरतेच मर्यादित राहील.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने दस्ताऐवजांचे विश्लेषण व सर्वेक्षण संशोधन पद्धती या संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**विश्लेषणात्मक विषयविवेचन:-**

**सामाजिक विचार:-** संविधानाची निर्मिती करताना बाबासाहेबांनी आपले सर्वस्व पणाला लावले. अखंड अविरत कष्ट करून संविधान ची संरचना तयार केली. या संविधानाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची तत्वे प्रस्थापित केलेली आहे, वास्तविक, हे त्यांच्या जीवनाचे सार तत्व होते त्यांच्या प्रत्येक लढ्याचे तेच अंतिम साध्य होते. त्यांनी प्रत्येक क्षणी समाजाला एकसंध बांधण्याचा प्रयत्न केला. समाजात एकात्मतेची उभारणी केली. त्यामुळेच बाबासाहेब "सामाजिक न्यायाचेही शिल्पकार" ठरतात. कोणताही महापुरुष आपल्या जीवनात काही उदात्त स्वप्ने पाहतो, त्यांच्या स्वप्नांना वैचारिक अधिष्ठान असते ती स्वप्ने मानवी कल्याणाची पथदर्शक असतात. बऱ्याच वेळा त्यातील काही स्वप्न पूर्ण होतात काही अपुरी राहतात डॉ. आंबेडकर यांनी आपल्या जीवनात अनेक स्वप्न पाहिले होती. जी त्यांनी सत्यात उतरवली बाबासाहेबांनी सातत्याने भारतातील दलित, शोषित, वंचित,उपेक्षित समूहांच्या उत्थानाचा विचार केला. त्यांना त्यांचे हक्क अधिकार मिळावेत ,त्यांच्यावरील अन्याय दूर होऊन त्यांना न्याय मिळावा यासाठी आंबेडकरांनी अविरत प्रयत्न केले. बाबासाहेबांचा लढा हा भारतातील सामाजिक विषमतेविरुद्ध होता कारण ही विषमता पिढ्यानपिढ्या दलित समूहांना गुलाम करून ठेवत . त्यांचे माणूसपण नाकारत होती. चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह या घटना त्यासाठी विचारात घेता येतील. त्याबरोबरच बाबासाहेबांनी उभारलेल्या विविध सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक संस्थांचाही उद्देश ही तोच होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाबासाहेबांनी भारतीय समाजाचे मूलगामी चिंतन करून विविध ग्रंथ लिहिले या ग्रंथांना संशोधन, विश्लेषण, मूल्यमापनाची, वस्तुनिष्ठ बैठक होती भारतातील जाती, त्यांची उत्पत्ती ,विकास, जाती व्यवस्थेचे

निर्मूलन, शूद्र पूर्वी कोण होते? अस्पृश्य मूळचे कोण? आणि अस्पृश्य कसे बनले इत्यादी ग्रंथातून बाबासाहेबांनी भारतीय समाजाची चिकित्सा केली. त्यातील जातीयता ,अस्पृश्यता ,विषमता, भेदाभेद आणि या सर्वांना असणारी धार्मिक चौकट त्यांनी तपासली भारतातील सामाजिक गुलामगिरीचे कारण इथली पारंपारिक धर्म व्यवस्था असल्याचे त्यांनी विशद केले, यासाठी त्यांनी गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून देऊन या व्यवस्थाविरुद्ध आवाज उठवण्याची ऊर्जा त्यांना दिली याच आंबेडकरी ऊर्जेतून अस्मिता दर्श होऊन समाज जागृत झाला त्याला आत्मभान मिळाले आणि तो आपल्या हक्कासाठी लढू लागला.

**स्त्री विषयक दृष्टीकोन:-**

प्रत्येक उपेक्षित समूहांना सामाजिक न्याय मिळावा ही आंबेडकरांची भूमिका होती. यामध्ये कामगार, शेतकरी मजूर, भटके, वंचित व आदिवासी समूह यांचा समावेश होता या समूहांच्या कल्याणासाठी बाबासाहेबांनी विविध स्वतंत्र कायदे तयार केले. समाजातील सर्वात दुर्बल ठरवलं गेलेल्या स्त्री विषयी बाबासाहेबांचे कार्य अतिशय मोठे आहे. त्यांनी स्त्रीचा आदर केला तिचे स्थान पुरुषांच्या बरोबरीने आहे असे सांगितले समाजामध्ये तिला प्रतिष्ठान मिळावी यासाठी तिचे हक्क व अधिकार कायद्याच्या माध्यमातून दर्जांकित केले."हिंदू कोड बिल" हा बाबासाहेबांनी लिहिलेला भारतीय स्त्रीच्या मुक्तीचा जाहीरनामाच आहे. यातून स्त्रीच्या अस्तित्वाची मागणी त्यांनी केली आहे. हे, बिल मंजूर होऊ नये म्हणून परंपरावादी लोकांनी जोरदार प्रयत्न केले परंतु बाबासाहेब मात्र मागे हटले नाहीत स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला स्त्रियांच्या उन्नतीसाठी आज जे अनेक कायदे केले. त्यामागे बाबासाहेबांची विचारदृष्टी आहे हे विसरून चालणार नाही. डॉ.आंबेडकरांनी "हिंदू कोड बिल" सादर केल्यानंतर त्याला प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी जोरदार विरोध केला. मात्र त्या पुढील काळात "हिंदू बिल" विविध लहान बिलातून स्वतंत्रपणे मंजूर झाले ते बाबासाहेबांचे यश होते . विविध स्वतंत्र मंजूर झालेल्या बिलातून स्त्रियांना पुढील प्रमाणे हक्क अधिकार प्रथमच प्राप्त झाले.

१.स्त्रीला स्वतःहून घटस्फोट घेण्याचा अधिकार

२. नवऱ्याने घटस्फोट दिल्यास किंवा घटस्फोटाशिवाय पतीपासून विभक्त राहिल्यास स्त्रीला पुढील जीवन व्यतीत करण्यासाठी पोरगी मिळण्याचा अधिकार

३. मुलीला वडिलांच्या मिळकतीवर मुला इतकाच समान हिस्सा मिळविण्याचा अधिकार तसेच मुलीला वडिलांच्या मिळकतीवर पारस होण्याचा अधिकार

४. स्त्रियांना स्वतः कमावलेल्या मिळकतीवर अधिकार

५. स्त्रियांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार तसेच मुलांप्रमाणे मुलीला देखील दत्तक जाण्याचा अधिकार

६. पतीला एक पत्नी असताना दुसरा विवाह करण्यास बंदी जेणेकरून स्त्रियांच्या होणाऱ्या हाल- अपेष्टा थांबतील.

७. आंतरजातीय विवाह करण्यास मान्यता.

८. स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार:-**

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. समाजात परिवर्तन घडवून आणावयाचे असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. डॉ.बाबासाहेब यांनी स्त्रियांचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही ,अशी भूमिका मांडून स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. मनूने स्त्रियांचे अधिकार हिरावून घेतले स्त्रियांना नाकारणारी व्यवस्था मनूच्या काळात आली. ही मनूची जुलमी व्यवस्था नाकारून स्त्रियांना सन्मानाने जगता यावे, अशी व्यवस्था आपल्या विचारांच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी प्रस्थापित केली. डॉ. बाबासाहेबांनी विद्यार्थी दशत असल्यापासून मुलांप्रमाणे मुलींना देखील शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांना वाटत होते व सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया पाहिजे असे त्यांचे विचार होते. स्त्रियांना शिक्षण तर द्यावे मात्र ते देखील सहशिक्षण द्यावे या मतांचे ते होते. स्त्री-पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण द्यावे या गोपाळ गणेश आगरकर यांच्या मताशी ते सहमत होते, म्हणून स्त्रियांसाठी वेगळ्या शाळा व महाविद्यालय असावी यास त्यांची सहमती नव्हती कारण त्यांना स्त्री शिक्षण स्त्री-पुरुषांच्या एकत्र शिक्षणात बरोबरच स्त्री पुरुष समानता हे तत्व देखील समाजात रुजवायचे होते.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर व कार्यवादातील जॉन ड्युई :-**

ड्यूई हे 1913 ते 1916 या काळात कोलंबिया युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क येथे आंबेडकरांचे शिक्षक होते. डेवीच्या कार्याची मुख्य थीम लोकशाही होती. ड्यूईच्या मते, लोकशाही केवळ प्रतिनिधित्वापुरती नसून सहभागाबाबत आहे. या सहभागासाठी सार्वजनिक तर्क आणि संवाद आवश्यक आहे, चौकशीच्या सतत विस्तारत असलेल्या आणि आत्म-गंभीर समुदायांमध्ये, नवीन पुराव्यावर आधारित, कृतीवर आधारित त्यांच्या विश्वासांची सतत उजळणी करणे.

ड्यूई यांनी लोकशाहीला केवळ राजकीय व्यवस्था न ठेवता नैतिक आदर्श म्हणून कल्पना केली आणि त्यामुळे ती राजकारणापासून अर्थव्यवस्थेपर्यंत आणि समाजापर्यंत पसरलेली पाहिली. त्यांनी शिक्षणाला लोकशाहीचा पाया आणि समाज सुधारणेची प्रमुख प्रक्रिया म्हणून पाहिले. स्वायत्त, विचारशील आणि व्यस्त कार्यक्षम व्यक्तींचा विकास करणे आणि त्यांच्या क्षमता पूर्ण क्षमतेने ओळखण्यात मदत करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे, ज्याचा उपयोग अधिक चांगल्यासाठी केला पाहिजे. शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे आणि अनुभव हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. प्रभावी शिक्षण केवळ विद्यार्थ्याने प्रक्रियेत आणि अभ्यासक्रमात

सक्रिय सहभागी म्हणून, सामग्री आणि शिक्षकाच्या भूमिकेला पुरेसे महत्त्व देऊन आणि बाल-केंद्रीवादाच्या अतिरेकाला न जुमानता शक्य आहे.ड्यूईने शिक्षकाला एक व्यावसायिक म्हणून पाहिले आणि शिक्षणाच्या उपक्रमात केंद्रस्थानी ठेवले. त्यांचे शैक्षणिक लेखन एक विलक्षण श्रेणी व्यापते, जे केवळ त्यांच्या महान बुद्धीचेच नव्हे तर शाळा चालवतानाचे त्यांचे वैयक्तिक अनुभव देखील प्रतिबिंबित करते.

आंबेडकरांच्या समता आणि सामाजिक न्यायाच्या कल्पनांनी ड्यूईसुद्धा प्रभावित झाले होते. आंबेडकरांनी या विद्यापीठात प्रथमच *स्वातंत्र्य, समता आणि बंधुता* तत्त्वांचा अनुभव घेतला होता. "कोलंबिया विद्यापीठातील जॉन डेव्ही, जेम्स शॉटवेल, एडविन सेलिगमन आणि जेम्स हार्वे रॉबिन्सन हे महान प्राध्यापक मला लाभले आणि येथेच आयुष्यातील अनेक चांगले मित्र येथे मिळाले", असे आंबेडकरांनी एका मुलाखतीत म्हणले होते.

**संशोधनाचे निष्कर्ष:- संशोधिकेने आपल्या संशोधनात पुढील निष्कर्ष मांडले आहेत**

**१. डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक विचार, स्त्री विषयक दृष्टीकोन, स्त्री शिक्षण विषयक विचार व शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.**

१. भारतीय समाजाला डॉ. आंबेडकरांनी संविधानातून कायद्याद्वारे स्वातंत्र्य, समता ,बंधुता व एकात्मता हे महत्त्वाचे अधिकार प्राप्त करून दिले.

२. स्त्री शिक्षणातूनच भारतीय स्त्रियांची तसेच अस्पृश्य समाजाबरोबरच इतर समाजाची व पर्यायाने देशाची उन्नती होईल हे डॉ. आंबेडकरांच्या विचारातून स्पष्ट झाले.

३. भारतीय समाजातील स्त्रियांना डॉ. आंबेडकरांनी संविधानातून कायद्याद्वारे महत्त्वाचे अधिकार प्राप्त करून दिले.

**२. डॉ.आंबेडकर व कार्यवादातील जॉन ड्यूई त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे.**

१. कार्यवादाचे प्रणेते जॉन ड्यूई यांनी कार्यवादामध्ये कृती आधारित शिक्षणाला महत्त्व दिले. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी समाजामध्ये परिवर्तन घडवून येण्यासाठी संविधान निर्मिती, स्त्री शिक्षण ,हिंदू कोड बिल यासारखे परिवर्तन प्रत्यक्ष कृतीद्वारे भारतीय समाजामध्ये घडवून आणले.

**शिफारशी:- संशोधकीने पुढील शिफारशी मांडल्या आहेत**

१. आजच्या समाजामध्ये स्वातंत्र्य, समता , बंधुता व एकात्मता या मूल्यांची संविधानामध्ये तरतूद असली तरीही माध्यमिक शिक्षणाद्वारे प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांना मूल्यांची रुजवणुक करण्याची आवश्यकता आहे.

२. ज्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवादाचे प्रणेते जॉन ड्यूई यांचे कृती आधारित अध्ययनाला महत्त्व दिले आहे ,त्याचप्रमाणे डॉक्टर आंबेडकर यच्या प्रेरणेने दुर्बल ,वंचित ,आर्थिक दृष्ट्याकमकुवत घटकांना सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी कृती केली जावी.

**संदर्भ:-**

कुंडले म.बा,(२०१२ );शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

https://m-marathi.webdunia.com/article/baba-saheb-ambedkar-marathi/education-of-dr-bhimrao-ambedkar-122041100059 retrieved on27 sep2024

https://scroll.in/article1044375/how-professor-john-dewey-br-ambedkars-teacher-inspired-him-with-his-liberal-and-and-progressive-ideas retrieved on 27sep 2024

https://velivada.com/2017/07/15/democracy-buddhism-babasaheb-buddha-johndewey/27 sep 2024

https://mr.wikipedia.org/wiki/dr-ambedkar retrieved on 25sep2024

https://ebooks.inflibnet.ac.in/socp13/chapter/babasaheb-ambedkar/retrieved on 25 sep 2024

https://www.esakal.com/maharashtra/dr-babasaheb-ambedkar-social-contributions-40045retrieved on 25 sep 2024